जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या

# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

शिवाजीनगर, गढी

अहवाल

## पारंपारिक दिन

### दि. 23 जानेवारी 2023

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी येथे विद्यार्थी विकास,राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने थोर स्वातंत्र्यसेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती अनोख्या पद्धतीने पारंपरिक वेशभूषा करून ट्रॅडिशनल डे म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली . या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून जयभवानी शिक्षण प्रसारक संस्थेचे कर्तव्य दक्ष अधिकारी प्रा. काशिनाथ गोगुले तर अध्यक्ष प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रा.गोगुले सर यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांचे विचार व कार्यावर प्रकाश टाकला. पुढे बोलताना त्यांनी असे सांगितले की आज तुम्ही महाविद्यालयामध्ये जो ट्रॅडिशनल डे पारंपरिक वेशभूषा परिधान करून साजरा करत आहात हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. असा नाविन्यपूर्ण उपक्रम साजरा करणारे हे जिल्ह्यातील पहिलेच महाविद्यालय असावे. सध्याच्या जागतिकीकरण, मोबाईल व संगणक यामध्ये गुरफटलेली तरुण पिढी आपली संस्कृती, रूढी,परंपरा विसरत चालली आहे. आपल्या महान भारतीय सांस्कृतीची, परंपरा- चालीरीतींची ओळख याद्वारे विद्यार्थ्यांना व्हावी. तसेच जगात भारत हा विविधतेने नटलेला देश आहे, अशी आपल्या संस्कार आणि संस्कृतीची ओळख दृढ व्हावी यासाठी अशा उपक्रमाचे आयोजन प्रत्येक महाविद्यालयात होणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी केलेले कार्य तसेच बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाची अस्मिता जपण्यासाठी केलेले कार्य याविषयी सविस्तर माहिती दिली. पुढे बोलताना ते म्हणाले की आमच्या महाविद्यालयात सातत्याने नवनवीन उपक्रम घेण्याचा आमचा मानस असतो. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही आज ट्रॅडिशनल डे अर्थात पारंपारिक दिवससाजरा करत आहोत. विद्यार्थ्यांना चांगल्या विचारांसोबतच आज लोप पावत असलेल्या आपल्या भारतीय संस्कृतीची, पारंपरिक चालीरितींची, प्रादेशिक, भाषिक, धार्मिक

विविधतेची ओळख व्हावी. यानिमित्ताने त्यांनी आपल्या देशातील विविध धर्म, जाती, प्रांतातील वेशभूषा चालीरीती यांचा अभ्यास करावा व या सर्व विविधतेतून आपण सर्व भारतीय एक व आहोत ही एकात्मतेची भावना त्यांच्यात निर्माण व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आणि विद्यार्थ्यांनी याला भरभरून प्रतिसाद दिला आहे ही अत्यंत कौतूकाची बाब आहे. असाच प्रतिसाद भविष्यातही राहावा. अशा उपक्रमातील सहभागद्वारे विद्यार्थ्यांनी आपला व्यक्तिमत्व विकास करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या ट्रॅडिशनल डे कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी विविध वेशभूषा मध्ये सहभागी झाले होते. यामध्ये झाशीची राणी लक्ष्मीबाई, राजमाता जिजाऊ, सईबाई, काशीबाई, महाराष्ट्रीयन गृहिणी,महाराष्ट्रीयन शेतकरी, लालबहादूर शास्त्री, पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस अशा विविध थोर पुरुषांच्या वेशभूषेबरोबरच प्रांतिक वेशभूषा करण्यात आल्या होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.शिवाजी काकडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोषकुमार यशवंतकर यांनी, तर आभारप्रदर्शन विद्यार्थी विकास विभाग प्रमुख प्रा.हिरा पोटकुले यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत बहुसंख्येने उपस्थित होते.




कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
पारंपारिक


GPS Map Camera
Vadgaon Dhok, Maharashtra, India
NH52, Shivajinagar, Vadgaon Dhok, Maharashtra 431143, India
Lat 19.214911°
Long 75.755026°
23/01/23 12:37 PM
52
Gevari Rd
Google








Shot on OnePlus
Powered by Triple Camera




दैनिक
महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
लोकाशा
25JAN2023

# आपली संस्कृती आणि संस्काराची ओळख दृढ व्हावी –प्रा. गोगुले के.आर.

गेवराई,दि.२४(लोकाशा न्युज): जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी येथे विद्यार्थी विकास,राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने थोर स्वातंत्र्यसेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती अनोख्या पद्धतीने पारंपरिक वेशभूषा करून ट्रॅडिशनल डे म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली . या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून जयभवानी शिक्षण प्रसारक संस्थेचे कर्तव्य दक्ष अधिकारी प्रा. काशिनाथ गोगुले तर अध्यक्ष प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रा.गोगुले सर यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांचे विचार व कार्यावर प्रकाश टाकला. पुढे बोलताना त्यांनी असे सांगितले की आज तुम्ही महाविद्यालयामध्ये जो ट्रॅडिशनल डे पारंपरिक वेशभूषा परिधान करून साजरा करत आहात हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. असा नाविन्यपूर्ण उपक्रम साजरा करणारे हे जिल्ह्यातील पहिलेच महाविद्यालय असावे. सध्याच्या जागतिकीकरण, मोबाईल व संगणक यामध्ये गुरफटलेली तरुण पिढी आपली संस्कृती, रूढी,परंपरा विसरत चालली आहे. आपल्या महान भारतीय सांस्कृतीची, परंपरा- चालीरीतींची ओळख याद्वारे विद्यार्थ्यांना व्हावी. तसेच जगात भारत हा विविधतेने नटलेला देश आहे, अशी आपल्या संस्कार आणि संस्कृतीची ओळख दृढ व्हावी यासाठी अशा उपक्रमाचे आयोजन प्रत्येक महाविद्यालयात होणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी केलेले कार्य तसेच बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाची अस्मिता जपण्यासाठी केलेले कार्य याविषयी सविस्तर माहिती दिली. पुढे बोलताना ते म्हणाले की आमच्या महाविद्यालयात सातत्याने नवनवीन उपक्रम घेण्याचा आमचा मानस असतो. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही आज ट्रॅडिशनल डे अर्थात पारंपारिक दिवससाजरा करत आहोत. विद्यार्थ्यांना चांगल्या विचारांसोबतच आज लोप पावत असलेल्या आपल्या भारतीय संस्कृतीची, पारंपरिक चालीरितींची, प्रादेशिक, भाषिक, धार्मिक विविधतेची ओळख व्हावी. यानिमित्ताने त्यांनी आपल्या देशातील विविध धर्म, जाती, प्रांतातील वेशभूषा चालीरीती यांचा अभ्यास करावा व या सर्व विविधतेतून आपण सर्व भारतीय एक व आहोत ही एकात्मतेची भावना त्यांच्यात निर्माण व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आणि विद्यार्थ्यांनी याला भरभरून प्रतिसाद दिला आहे ही अत्यंत कौतूकाची बाब आहे. असाच प्रतिसाद भविष्यातही राहावा. अशा उपक्रमातील सहभागद्वारे विद्यार्थ्यांनी आपला व्यक्तिमत्व विकास करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या ट्रॅडिशनल डे कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी



विविध वेशभूषा मध्ये सहभागी झाले होते. यामध्ये झाशीची राणी लक्ष्मीबाई, राजमाता जिजाऊ, सईबाई, काशीबाई, महाराष्ट्रीयन गृहिणी,महाराष्ट्रीयन शेतकरी, लालबहादूर शास्त्री, पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस अशा विविध थोर पुरुषांच्या वेशभूषेबरोबरच प्रांतिक वेशभूषा करण्यात आल्या होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.शिवाजी काकडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोषकुमार यशवंतकर यांनी, तर आभारप्रदर्शन विद्यार्थी विकास विभाग प्रमुख प्रा.हिरा पोटकुले यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत बहुसंख्येने उपस्थित होते.